पुण्य नगरी
कोल्हापूर । गुरूवार, ९ जुलै २०२६

# 'विवेकानंद'च्या प्राचार्यपदी डॉ. मिलिंद हुजरे



**कोल्हापूर :** श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे प्रभारी सचिव प्राचार्य डॉ. मिलिंद शिवाजीराव हुजरे यांची कोल्हापूर येथील विवेकानंद कॉलेज (अधिकारप्रदत्त स्वायत्त)च्या प्राचार्यपदी निवड करण्यात आली. यापूर्वी त्यांनी संस्थेचे अर्थसचिव म्हणून काम पाहिले असून संस्थेच्या शैक्षणिक, भौतिक सुविधा तसेच गुणवत्ता विकासासाठी महत्त्वपूर्ण जबाबदारी पार पाडलेली आहे. सन १९८८ पासून प्राणीशास्त्र विषयाचे प्राध्यापक म्हणून राजे रामराव कॉलेज, जत येथे त्यांच्या सेवेची सुरुवात झाली. त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर प्राणीशास्त्र विषयातील ३५ शोधनिबंध प्रसिद्ध केले आहेत. तसेच चार आंतरराष्ट्रीय संशोधन प्रकल्प यशस्वीपणे पूर्ण केले आहेत. यापूर्वी त्यांनी प्राचार्य म्हणून पद्मभूषण डॉ. वसंतदादा पाटील महाविद्यालय, तासगाव, दत्ताजीराव कदम ए. एस. सी. कॉलेज, इचलकरंजी, या शाखेवर काम केले असून, इचलकरंजी शाखेला 'नॅक'चे ए मानांकन प्राप्त करण्यासाठी त्यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले आहे. प्राचार्यपदाचा पदभार स्वीकारल्याबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे व मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी त्यांचे अभिनंदन केले.